बीड । शनिवार
२२.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३१६
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 

# मस्साजोगच्या गावकऱ्यांकडून अन्नत्याग आंदोलनाची घोषणा

## देशमुख कुटुंबियांना न्याय देण्याची मागणी,धनंजय मुंडे सहआरोपी का नाही-जरांगे





बीड, (प्रतिर्निधी) :- संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय मिळावा यासाठी मस्साजोगच्या गावकऱ्यांनी अन्नत्याग आंदोलन करणार असल्याची घोषणा केली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चेनंतर त्यांनी ही घोषणा केली आहे. तर या प्रकरणात धनंजय मुंडेंना सहआरोपी का करत नाही, ते मंत्री म्हणून होत नाही का, असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी सरकारने देशमुख कुटुंबियांकडे येणे गरजेचे होते. मस्साजोगचे गावकरी जर अन्नत्याग आंदोलन करणार असतील तर मी देखील तुमच्यासोबत बसेल.

मनोज जरांगे म्हणाले की, संतोष देशमुख यांची हत्या होऊन आता अडीच महिने उलटले आहेत. गावकऱ्यांसह देशमुख कुटुंबियांनी अन्नत्याग आंदोलनाची घोषणा केली हा सरकारची नाचक्की करणारा निर्णय आहे, असा टोला जरांगे पाटील यांनी लगावला आहे. चार्जशीटमध्ये काही घोटाळा होऊ शकतो अशी शक्यता त्यांनी वर्तवली आहे. तर तपास यंत्रणांना पूर्ण अधिकार दिले नसल्याचा दावाही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मनोज जरांगे म्हणाले की, सरकारने सांगितल्याशिवाय पोलिसांनी आमचे आंदोलन मोडण्यासाठी गोळीबार केला नाही, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. सरकारने सांगितल्यावर सर्व काही होते. त्यांनी सांगितल्याशिवाय आमचे रक्त सांडले नाही. पोलिसांवर दबाव आल्यामुळेच त्यांनी ते पाऊल उचलले. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, संतोष देशमुख प्रकरणामध्ये गुन्हेगारांना अटक का होत नाही. त्यांच्या मंत्रिमंडळात माणूस आहे, त्यांना गुंड सांभाळायचे आहे. अन्नत्याग आंदोलनाचा गावकऱ्यांचा निर्णय आहे तो तुमचा निर्णय आहे आम्ही त्यात हस्तक्षेप करणार नाही. संपूर्ण राज्य तुमच्यासोबत आहे, असेही यावेळी त्यांनी म्हटले आहे.


### मुंडे देशमुख हत्या प्रकरणी सह आरोपी का होत नाही?



मनोज जरांगे म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी जर आदेश दिले असते की कुणाला सोडू नका तर बीडचे अर्धे जेल भरले असते, एवढी मोठी खंडणी मागणाऱ्यांची टोळी आहे. त्यांना सांभाळणारा एक जण आहे. त्याला काय तरी झाले आहे. तो ही यांच्यातीलच आहे म्हणून आम्ही धनंजय मुंडे यांचे नाव घेतो. माध्यमांनी दाखवले होते की बड्या नेत्याला फोन केला होता मग हा बडा नेता कोण आहे, असा सवाल जरांगे पाटील यांनी उपस्थित केला आहे. तुलाच असा नाद आहे, बाकी कुणाला असा नाद नाही, असा टोलाही त्यांनी मुंडेंना लगावला आहे. तुमचेच लोक म्हणाले की याने पालकमंत्रीपद कराडला विकले होते. मग धनंजय मुंडे संतोष देशमुख हत्या प्रकरणी सह आरोपी का होत नाही, आमच्या सारख्याचे लेकरं होतात. ते मंत्री आहेत म्हणून होत नाही का? धनंजय मुंडे सहआरोपी व्हायलाच पाहिजे.

# खा.बजरंग सोनवणेंची परदेशात क्रेझ

## शिवजयंतीनिमीत्त आले अबुधाबीतून निमंत्रण



**केज** । प्रतिनिधी

महाराष्ट्रासह देशभरात आणि आता जगभरात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. यावर्षी अरब देशातील अबुधाबीमध्ये दि.२३ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले असून या कार्यक्रमाला प्रमूख पाहूणे म्हणून बीडचे खा.बजरंग सोनवणे यांना निमंत्रीत करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जगभरातील विविध देशात साजरी केली जात आहे. महाराष्ट्र आणि हिंदूस्थानातील नागरिक परदेशात आता शिवजयंती साजरी करू लागले आहे. अरब देशातील अबुधाबी येथे मागील सात वर्षांपासून उमेश नळगे पाटील, प्रदिप आघाव हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे आयोजन करत आहेत. यावर्षीही जयंती उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येत आहे. दरवर्षी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना या जयंती उत्सवाचे निमंत्रण दिले जात असते. यावर्षी बीड जिल्ह्यातील जनतेने मोठ्या विश्वासाने निवडून दिलेले खा.बजरंग सोनवणे यांना प्रमुख म्हणून निमंत्रीत केले आहे. त्यांच्यसोबत मोलीजीराजे शाहू छत्रपती, मंत्री आयुष स्वतंत्र प्रभार आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री भारत सरकार-ना.प्रतापराव जाधव यांनाही निमंत्रीत करण्यात आलेले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभा निवडणूकीत विजयी ▶▶पान २ वर

# अतिक्रम मोहिम पुन्हा सुरू

**बीड** । प्रतिनिधी

नगर पालिकेच्यावतीने मागील चार ते पाच दिवसापासून अतिक्रमण हटाव मोहिम राबवण्यात येत असून या मोहिमेच्या माध्यमातून ठिकठिकाणचे अतिक्रमण काढण्यात येत आहे. आज शहरातील बशीरगंज ते नवी भाजी मंडई, आदर्श मार्केट, सुभाष रोड, स्टेडियम परिसर, धोंडीपुरा या भागातील रोडवरील अतिक्रमण काढण्यात आले असुन आदर्श मार्केटच्या दुकानासमोरील सर्वच अतिक्रमण काढल्याने व्यापारी आक्रमक होत आज आपले दुकाने बंद ठेवून अतिक्रमणा विरोधात निषेध नोंदवला आहे. बीड शहरातील नगर रोड, बार्शी रोड, राजुरीवेस या भागातील

## अतिक्रमणा विरोधात आदर्श मार्केट कडकडीत बंद



अतिक्रमण हटविण्यात आले आहे. काही ठिकाणी अतिक्रमण पाडापाडी ▶▶पान २ वर

# राष्ट्रीय महामार्ग वृक्षतोडीमुळे वाटसरूंची शितल सावली हरवली

**बीड** । प्रतिनिधी

मराठवाड्याचे हरितछत्र अवघ्या ५ व बीड जिल्ह्याचे २.५ टक्क्यांवर आलेले असताना केंद्र आणि राज्य शासनाच्या विकास धोरणानुसार महामार्ग रूंदीकरणाच्या कामांमुळे भविष्यात गतिमान अशी दळणवळण व्यवस्था तयार व्हावी यासाठी रस्ते, महामार्ग रूंदीकरणाची कामे करण्यात आलेली आहेत.रस्ते विकासाच्या नावाखाली रस्ते विकास महामंडळाने धुळे ते सोलापूर व बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील शेकडो वर्षापुर्वीची चिंच,वड, कडुनिंब,पिंपळ, औदुंबर सारख्या झाडांची अक्षरक्ष: कत्तल करण्यात आली असुन नियमानुसार तोडलेल्या झाडांच्या दहापट झाडे ▶▶पान २ वर



# सीईओंनी दिल्या परिक्षा केंद्रांना भेटी

## दहावीच्या परिक्षा : पहिल्याच पेपरला एक रेस्टीकीट



**बीड** । प्रतिनिधी

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (दहावी) आजपासून सुरू झाल्या आहेत. आज पहिल्याच पेपरला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी शहरातील चार परिक्षा केंद्रांना अचानक भेटी दिल्या. या भेटी दरम्यान त्यांनी चंपावती शाळेच्या परिक्षा केंद्रावर एका विद्यार्थ्यावर कारवाई केली. त्याचबरोबर अनेक परिक्षा केंद्रावर त्यांना गैरसोयी आढळून आल्या. काही ठिकाणी खिडक्यांची तावदाने फुटलेली आढळून आली. यावरून त्यांनी संबंधीत ▶▶पान २ वर

# आरएसएसमुळे माझा मराठीशी संबंध

## ज्ञानबा-तुकोबाच्या भाषेला राजधानी दिल्लीचं नमन-प्रंतप्रधान मोदी



**दिल्ली** । वृत्तसेवा

मी मराठीतून विचार केला तर मला ज्ञानेश्वरांच्या ओळी आठवल्याशिवाय राहत नाही. माझ्या मराठीची बोलू, परि अमृताताशीची पैजा जिंके, या त्यांच्या ज्ञानेश्वरांच्या ओळी आहेत. आरएसएसची स्थापना करणारेही मराठीच होते. गोळवलकरांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने एक बीज रोवलं होतं, त्याचा वटवृक्ष झालाय . १०० वर्षापासून संघ चालवत आहे. ▶▶पान २ वर



# आत्मघाती अहंमन्य!



आपल्या पूर्वसुरी विरोधकांनी जे केले त्याच्या नेमकी उलट कृती करणे, त्यांना बोल लावणे, त्यांना अयोग्य ठरवणे यातच स्वत:च्या कृतीची योग्यता शोधणारे जगाच्या पाठीवर कमी नाहीत. यांचा समजेचा अवकाश मर्यादित असतो आणि स्वत:च्या शहाणपणापेक्षा आपल्या पूर्वजांना मूर्ख ठरवणे इतकीच त्यांची झेप असते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे अशांतील एक. अमेरिकेसारख्या प्रबळ आणि प्रभावशाली देशाचे नेतृत्व अशा व्यक्तीकडे जाणे हे त्या देशाचे आणि त्यापेक्षाही अधिक जगाचे दुर्दैव. ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हातात घेऊन जेमतेम दोन महिनेही झालेले नाहीत; पण आपण काय काय उत्पात घडवू शकतो याची चुणूक दाखवण्याची एकही संधी त्यांनी सोडलेली नाही. आपल्या विजयाची इच्छा बाळगणाऱ्यांचे तर नाक पुरते ठेचल्याखेरीज ट्रम्प थांबणार नाहीत असे दिसते. यात अमेरिकेतील रिपब्लिकन जसे येतात, तसे भारतात त्यांच्या विजयासाठी देव पाण्यात घालून बसणारे येडबंबू विचारांधळेही येतात. यातील पहिल्या वर्गातील शहाणे– म्हणजे अमेरिकेतील रिपब्लिकनांतील काही– ट्रम्प यांच्याविरोधात व्यक्त होऊ लागले असून दुसऱ्या वर्गात हे शहाणपण झिरपण्यास अंमळ वेळ जावा लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी 'नको नको' म्हणत असताना, नाराजी व्यक्त करत असताना आपण त्यांना आयात करवाढीसंदर्भात कसे सुनावले याची जाहीर आणि अत्यंत असभ्य फुशारकी ट्रम्प यांनी मारली असली तरी ती अनेकांची 'अगली बार'ची झिंग उतरवण्यास पुरेशी असेलच असे नाही. असो. त्या– म्हणजे भारतासंदर्भातील– विषयास स्पर्श करण्याची संधी यापुढे वारंवार देण्यास ट्रम्प समर्थ आहेत. तूर्त युक्रेन आणि रशिया या संदर्भात त्यांनी तोडलेल्या ताऱ्यांबाबत. त्यात कहर आहे तो 'रशियाशी युद्ध युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनीच सुरू केले' हे ट्रम्प यांचे विधान. त्यामुळे खुद्द ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षात खळबळ उडाली असून साऊथ कॅरोलायना, साऊथ डाकोटा, आयोवा इत्यादी प्रांतांचे लोकप्रतिनिधी ट्रम्प यांच्या या भूमिकेपासून फारकत घेताना दिसतात. ही संख्या तूर्त लहान असेल. पण ही केवळ सुरुवात आहे आणि ट्रम्प यांना अध्यक्षपदी येऊन दोन महिनेही झालेले नाहीत. इतकेच नाही तर काही वृत्तवाहिन्यांच्या पाहण्यांत निम्म्यापेक्षा अधिक सहभागींनी 'ट्रम्प अती करत आहेत' असे मत नोंदवले. या सगळ्यामुळे ट्रम्प यांस तूर्त तरी काही फरक पडणार नाही. कारण आपल्या आधीचे आणि त्यातही डेमॉक्रॅटिक पक्षाचे नेतृत्व वेडे ठरवणे हीच ट्रम्प यांच्या शहाणपणाची परिसीमा. तथापि यामुळे अमेरिकेचे जागतिक राजकारणातील एकंदर स्थानच धोक्यात आले असून युक्रेनच्या मुद्द्यावर त्यांनी घेतलेल्या जाहीर भूमिकेने जगभरात अनेकांनी अमेरिकेवर यापुढे किती विश्वास ठेवावा असा प्रश्न विचारला आहे. ते योग्यच. याचे साधे कारण असे की अमेरिकेचे जागतिक अस्तित्वच मुळी अवलंबून आहे ते रशियाविरोधातील दुसरा ध्रुव असे. पण ट्रम्प महाशय तेच पुसून टाकायला निघालेले दिसतात. आपला इतिहास पुसून नवा इतिहास लिहिण्याची त्यांची घाई इतकी की ते युक्रेन–रशिया युद्धासाठी झेलेन्स्की यांना जबाबदार धरतात आणि त्यांची संभावना 'हुकूमशहा' अशी करण्यापर्यंत ट्रम्प तात्यांची मजल जाते. हा वेडाचार असाच चालत राहिला तर जगातील खरा लोकशाहीवादी म्हणून ते पुतिन यांस मिठीत घेण्याचा क्षण फार दूर नाही. सारे जग जाणते की तीन वर्षांपूर्वी २४ फेब्रुवारी या दिवशी पुतिन यांनी युक्रेनवर हल्ला केला आणि त्या देशास स्वतंत्र अस्तित्वाचा अधिकार नाही असे भाष्य केले. आता त्या पुतिन यांस काहीही बोल न लावता ट्रम्प चक्क झेलेन्स्की यांनाच दोष देणार. यातून एक बाब ठसठशीतपणे स्पष्ट होते. ती म्हणजे अध्यक्षपदी विराजमान होण्याआधीच ग्रीनलँडवर हक्क सांगणारे, पनामा कालवा परत द्या अशी मागणी करणारे आणि हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवल्यासारखे इजिप्त आदी देशांना पॅलेस्टिनींना सामावून घ्या असा 'आदेश' देणारे ट्रम्प आणि जॉर्जियास हात घालणारे, युक्रेनवर हल्ला करणारे पुतिन यांच्या मानसिकतेत मूलत: काहीही फरक नाही. हे सत्य वारंवार समोर येणार असेल तर त्यामुळे अनेक धुरीणांस जगाची घडी नव्याने बसवावी असे वाटणार आणि तसे करावे लागणार. त्याची सुरुवात झाल्याची चिन्हे दिसतात. ज्या पद्धतीने इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनी या देशांनी अधिकृतपणे ट्रम्प यांच्यापासून फारकत घेत झेलेन्स्की यांना जाहीर पाठिंबा दिला त्यात या आगामी रचनेची चिन्हे दिसतात. या तीनही देशांच्या प्रमुखांनी स्वतंत्रपणे झेलेन्स्की यांच्याशी संपर्क साधला आणि रशियाविरोधातील संघर्षात उघड पाठिंबा जाहीर केला. याचा अर्थ ''झेलेन्स्की यांना जायला एकही देश उरणार नाही'' ही ट्रम्प यांची ताजी दर्पोक्ती अमेरिकेच्याच एकेकाळच्या मित्रदेशांनी फोल ठरवली. हे यापुढे वारंवार होईल. ग्रहताऱ्यांत काहीही चांगले–वाईट, शुभ–अशुभ नसते असेच 'लोकसत्ता' मानत असला तरी केवळ लोकप्रिय उपमा म्हणून ट्रम्प आणि पुतिन यांचे एकाच वेळी सत्तेत असणे हे 'राहू–केतू एकाच घरात' असल्यासारखे म्हणावे लागेल. यातील पुतिन यांनी आपण तहहयात अध्यक्षपदी राहू अशी तजवीज केलेली आहे आणि आपल्यालाही तसे काही करायला आवडेल अशी इच्छा ट्रम्प यांनी व्यक्त केलेली आहे. तेव्हा हे संकट इतक्यात तरी काही संपुष्टात येण्याची शक्यता नाही. तसे होईल तेव्हा होवो. पण ट्रम्प यांच्या या भूमिकेमुळे आणखी एक गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. ती म्हणजे चीन. पुतिन यांच्या रशियाने झेलेन्स्की यांच्या युक्रेनवर केलेला हल्ला रास्त ठरत असेल, पॅलेस्टिनी भूमीत इस्रायलचा अमानुष अतिरेक गोड मानून घ्यावयाचा असेल तर उद्या चीन याच मार्गाने तैवानचा घास घ्यायला गेल्यास त्यास हे कोणत्या हाताने रोखणार? हे कल्पनाचित्र नाही. उंबरठ्यावर येऊन ठेपलेले वास्तव असून त्याचा अंदाज आत्मप्रेमात आकंठ बुडालेल्या ट्रम्प यांस आहे किंवा काय हा प्रश्नच. परत तो विचारणार कोण हा दुसरा प्रश्न. स्वत:च्याच प्रेमात पडलेल्याचा प्रेमभंग अशक्य असतो. पण या आत्मप्रेमींमुळे जगावरील विद्यमान आणि भावी संकटांस सामोरे कसे जावे याचा विचार शहाणपण शाबूत असलेल्या धुरीणांस तातडीने करावा लागेल. ती वेळ येऊन ठेपली आहे. ''माझ्याशी कोणी वाद घालू शकत नाही'' असे ट्रम्प म्हणतात. ते खरे आहे. कारण अशा आत्मप्रेमीशी वाद घालण्यापेक्षा दगडी भिंतीवर डोके आपटणे कमी वेदनादायी याचे भान सर्वांस असल्याने ट्रम्प यांच्याशी वाद घालण्यास जाणार कोण? तसे करून वेळ दवडण्यापेक्षा युक्रेनला वाचवायचे कसे, पॅलेस्टिनींना आधार द्यायचा कसा याचा मार्ग शोधणे अधिक गरजेचे आहे. ''मातृभूमीच्या भल्यासाठी जो काम करतो त्याच्याकडून कधीही कायदेभंग होत नाही'' अशा अर्थाचे अत्यंत भंपक ट्वीट हे ट्रम्प करतात. आपण काहीही केले तरी ते देशासाठीच आहे असे म्हणण्याची सोय राजे–सम्राटांना असते कारण त्यांच्या कृतीचे मूल्यमापन करण्याची मुभा प्रजेस नसते. ट्रम्प यांचा प्रवास त्या दिशेने सुरू आहे. ''लाँग लिव्ह द किंग'' असे दुसऱ्या ट्वीटमधे ते स्वत:च्याच निर्णयास उद्देशून म्हणतात. हा प्रकार अहंमन्य अमेरिकेसाठी आत्मघातकी ठरेलच; पण जगासाठीही तितकाच घातकी ठरेल, हे नि:संशय.

## परिचर्या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी

# स्वा.रा.ती. मध्ये काम बंद आंदोलन



अंबाजोगाई, (प्रतिनिधी) : महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने पदोन्नती कार्यवाही जलद गतीने करण्याचे परिपत्रक काढले आहे. मुख्यमंत्र्यांनी देखील १०० दिवसांच्या कार्यक्रमात सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती प्रक्रियेस गती देण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे सेवा प्रवेश नियम अद्याप मंत्रालय स्तरावर प्रलंबित असल्याने परिचर्या संवर्गातील पदोन्नती रखडल्या आहेत. या समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी स्वा.रा.ती. (स्वामी रामानंद तीर्थ) रुग्णालयातील परिचारक व परिचारिकांनी एक दिवसाचे काम बंद आंदोलन पुकारले. परिचर्या संवर्गातील सर्व पदोन्नती सेवाज्येष्ठतेनुसार कराव्यात, परिचारिकांना मिळणारे परिचर्या भत्ते वाढवावेत, ग्रामीण रुग्णालयातील परिसेविका पद पुनर्जीवित करावे, बंधपत्रित परिचारिकांचा सेवा कालावधी नियमित करावा, बक्षी समिती खंड–२ मध्ये परिचर्या संवर्गावर झालेला अन्याय दूर करावा, परिविक्षा कालावधीसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत अधिपरिचारिका पद वगळावे अशा संघटनेच्या मागण्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून संघटनेतर्फे या पदोन्नतींसाठी पाठपुरावा केला जात आहे. अनेक बैठका व पत्रव्यवहार करूनही अद्याप काही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे अखेर परिचारिकांनी आंदोलनात्मक भूमिका घेतली आहे. ✻ शासनाने दखल न घेतल्यास बेमुदत संपाचा इशारा : परिचारिकांनी पुकारलेल्या या एक दिवसीय काम बंद आंदोलनाची दखल शासनाने घेतली नाही, तर पुढील टप्प्यात बेमुदत संप करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. या आंदोलनात महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सिंग फेडरेशन संलग्न परिचारिका सेवा संघ, अंबाजोगाईच्या अध्यक्षा श्रीमती चित्ररेखा बांगर, सचिव श्रीमती रागिणी पवार, कार्याध्यक्ष मंगेश सुरवसे, उपाध्यक्ष राम फड तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी श्रीमती आशा माने, अशोक मोराळे, मनोज जरांगे, नीता घोडके, वर्षा ठाकूर आणि सर्व परिचारक–परिचारिकांनी सहभाग घेतला. शासनाच्या पुढील भूमिकेकडे संपूर्ण परिचर्या संवर्गाचे लक्ष लागले आहे.

# शरद पवारांकडून नरेंद्र मोदींचं कौतुक; संजय राऊतांची प्रतिक्रिया

दिल्ली, (वृत्तसेवा):– दिल्लीतील ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारही उपस्थित होते. यावेळी शरद पवारांनी पंतप्रधान मोदींचं कौतुक केल्याचं पाहायला मिळालं. यावरुनच शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना प्रसारमाध्यमांनी प्रश्न विचारला. यावेळी राऊत म्हणाले की, करु दे ना कौतुक, स्वाताध्यक्ष व्यक्तीला तो शिष्टाचारा पाळावा लागतो, तो शरद पवार साहेबांनी पाळल्याचे राऊत म्हणाले. पवारांचं स्टेटस मोदींपेक्षा जास्त आहे. पवाारांचा राजकारणाचा अनुभव मोठा आहे. ते टोलेजंग व्यक्तीमत्त्व आहेत. मोदींना राजकीयदृष्ट्या मदत करणारी दोन नाव आहेत. पहिलं नाव बाळासाहेब ठाकरे आणि दुसर नाव शरद पवार असल्याचे राऊत म्हणाले. शरद पवारांना खुर्चीवर बसायला पंतप्रधान मोदींनी मदत केली, यावर देखील संजय राऊतांना विचारण्यात आले. यावेळी राऊत म्हणाले की, त्यांच्या जागी दुसरं कोणी असतं तरी तेच केलं असतं. राहुल गांधीही खर्गे साहेबांसाठी तेच करतात असे राऊत म्हणाले. पवारांचं स्टेटस मोदींपेक्षा जास्त आहे. राजकारणाचा अनुभव पवाारांचा.. टोलेजंग आहे असे राऊत म्हणाले. तुम्ही संमेलनाला जाणार का? असा देखील सवाल प्रसारमाध्यमांनी राऊतांना विचारला. यावेळी राऊत म्हणाले की, मुख्य मैदान तालकटोरा इथे उद्घाटनाला जायला हवं होतं. तिथं परिक्षा पे चर्चा हा कार्यक्रम तुमचा झाला, मग सुरक्षेचा काय प्रश्न. कवी–साहित्यिक–पुस्तकविक्रिते त्यांच्यापासून काय तुम्हाला धोका. मला ते रहस्य कळत नाही असेही राऊत म्हणाले. मी तेव्हाचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरुंचं भाषणही वाचलयं. आता मोदींचंही भाषण ऐकलं आहे. पंतप्रधानांनी मराठी भाषेसाठी, साहित्य संमेलनाला साजेसं भाषण केलं आहे. प्रत्यक्ष जी जागा आहे, तिथे लोक ताटकाळतायेत. मोदींची भाषणं आवडत नाही असं नाही. तेव्हा त्यांची भाषणं चांगली होती. आताची भाषण खूपचं साचेबंद, एका पक्षाचे नेते म्हणून प्रधानमंत्र्यांनी बोलू नये असेही राऊतच म्हणाले. आज दिल्लीत ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते झाले.

## पान १ वरून

### खा.बजरंग सोनवणेंची...

झाल्यानंतर तातडीने बीड–अहिल्यानगर रेल्वेप्रश्नी लक्ष घातलेले आहे. या शिवाय मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी सर्वप्रथम आवाज उठविला होता. अगदी संसदेत सुध्दा त्यांनी हा विषय पोटतिडकीने आणि माणूसकीच्या नात्याने मांडून महाराष्ट्रासह देशभरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. याच कारणाने महाराष्ट्रासह परदेशातील भारतीय नागरिकांमध्ये खा.बजरंग सोनवणे यांची क्रेझ निर्माण झाली आहे. दि.२३ फेब्रुवारी रोजी अबुधाबी येथे होत असलेल्या शिवजयंती कार्यक्रमास ते उपस्थित राहून भारतीय नागरिक आणि शिवप्रेमींशी ते संवाद साधणार आहेत. बीडचे खा.बजरंग सोनवणे हे अबुधाबीला जयंतीनिमीत्त जात असल्याने ही जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे.

### राष्ट्रीय महामार्ग...

लावण्याची जबाबदारी रस्ते विकास महामंडळावर असतानाही याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केला जात आहे. महामार्गावरील दोन बाजुंना दुतर्फा असलेल्या जुनाट वटवृक्षांची अभेद्य तटबंदी आणि ईतर अनेक प्रकारच्या वृक्षांची विपुलता असल्याने महामार्गावर प्रवास करताना वाहनचालक व प्रवाशांना आल्हाददायक वातावरणाची अनुभुती मिळत असे मात्र आता महामार्ग रूंदीकरणाच्या कामांमुळे वृक्षतोड झाल्याने वाटसरूंची सावली सुद्धा हिरावली आहे.याबद्दल वृक्षप्रेमी आणि पर्यावरण प्रेमींकडुन नाराजी व्यक्त केली जात असुन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिनजी गडकरी आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना लेखी तक्रार करत वनक्षेत्र व हरित क्षेत्र वाढीसाठी पुढाकार घेण्याची मागणी केली आहे. बीड जिल्ह्यात २.४ टक्के ईतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे.बीड जिल्ह्यात वारंवार दुष्काळाचे संकट ओढावत आहे. झाडांच्या मुळांमुळे जमिनीची धुप नियंत्रण राहते.वृक्षतोडीमुळे जमिन नापिक होऊन जैवविविधता कमी होते. वृक्षतोडीमुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडची पातळी वाढते ज्यामुळे तापमान वाढते आणि ग्लोबल वार्मिंगचा धोका वाढतो .जंगलामध्ये अनेक प्राणी पक्षी आणि वनस्पतींचे निवासस्थान असते वृक्षतोड झाल्यामुळे त्यांच्या निवासस्थानाचा नाश होतो आणि त्यांचे जीवन धोक्यात येते त्यामुळे अनेक प्रजाती नामशेष होण्याची शक्यता वाढते. झाडे पाण्याचे संचयन आणि वितरण नियंत्रित करतात .वृक्षतोड झाल्यामुळे पर्जन्यचक्रावर परिणाम होतो, ज्यामुळे पाऊस कमी होण्याची शक्यता वाढते.आणि दुष्काळाचे प्रमाण आवडते .झाडे हवेतील हानिकारक घटक शोषून घेतात आणि स्वच्छता हवा उपलब्ध करून देतात .वृक्षतोड झाल्यानंतर हे प्रदूषण वाढते त्यामुळे मानवाचे आरोग्य धोक्यात येते वृक्षतोडीमुळे या सर्व परिणामांचे संघ पर्यावरणाच्या संतुलनावर मोठा परिणाम करतो पर्यावरणाच्या दीर्घकाळ टिकाऊपणासाठी वृक्षतोड कमी करणे आणि जास्तीत जास्त झाडे लावणे आवश्यक असते.पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. वनक्षेत्र आणि हरित क्षेत्र वाढविण्यासाठी शासनाकडून झाडे लावा झाडे जगवा म्हणत कोट्यावधींचा खर्च कागदोपत्रीच करण्यात येत असल्याचे दिसून आले आहे. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील वनक्षेत्र आणि हरित क्षेत्र वाढीसाठी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## पान १ वरून

### अतिक्रम मोहम...

होण्याच्या अगोदर लोकांनी स्वत:हून अतिक्रमण काढून बाजूला ठेवले होते. शिवजयंतीनिमित्त दोन दिवस मोहिम थांबवण्यात आली होती. ती आज परत सुरू करण्यात आली. काही ठिकाणी अतिक्रमण काढल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्या जागेवर अतिक्रमण होत असल्याचे दिसत आहेत. मोहिम पुढे चालू मात्र पाठीमागे पुन्हा अतिक्रमण होवू नये यासाठी नगर पालिकेने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकत आहे. दरम्यान आज शहरातील बशीरगंज ते नवी भाजी मंडई, आदर्श मार्केट या रोडवरील अतिक्रमण काढण्यात आले असुन आदर्श मार्केटच्या दुकानासमोरील सर्वच अतिक्रमण काढल्याने व्यापारी आक्रमक झाले होते.

### सीईओंनी दिल्या...

परिक्षा केंद्र संचालकांना सक्त सुचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांची गैरसोय होवू नये, परिक्षा केंद्र सुसज्ज ठेवा अशा सुचना दिल्या. सीईओ जीवने यांच्यासमवेत विस्तार अधिकारी मिलिंद तुरुकमारे, उपशिक्षणाधिकारी हजारे, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम पवार आदींची उपस्थिती होती. सीईओ जीवने यांनी चंपावती शाळा, भगवान विद्यालय, शिवाजी विद्यालय, इंदिरा गांधी विद्यालय या परिक्षा केंद्रांना भेटी दिल्या. परिक्षा प्रक्रियेत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी त्यांनी त्यांनी केंद्रप्रमुख पर्यवेक्षक आणि भरारी पथकांना आवश्यक त्या सुचना दिल्या. सुरक्षा व्यवस्था, विद्यार्थ्यांना पुरवल्या जाणाऱ्या सुविधा, उत्तर पत्रिका वितरण प्रक्रिया आणि सीसीटिव्ही यंत्रणाची तपासणी केली. संबंधीत अधिकाऱ्यांना त्वरित कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले.

### आरएसएसमुळे माझा...

माझ्यासारख्या अनेकांना आरएसएसने देशासाठी जगायला शिकवलं. संघामुळेच मला मराठी भाषेशी संबंध आलाय, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी नरेंद्र मोदी बोलत होते. यावेळी संमेलनाच्या अध्यक्षा तारा भवळकर, ज्येष्ठ नेते शरद पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित होते. नरेंद्र मोदी म्हणाले, फार छान म्हणत मी भवाळकरांना म्हणालो. त्या म्हणाल्या 'मने गुजराती आवडे छे'...देशाच्या आर्थिक राज्यातून देशाच्या राजधानी आलेल्या सर्व मराठी सारस्वतांना माझा नमस्कार...समर्थ रामदास म्हणाले, 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' जिकडे तिकडे भाषा ही परिपूर्ण भाषण...शूरता आहे, वीरता आहे, समानता आहे. भारताला जेव्हा अध्यात्मिक ऊर्जेची गरज असते, तेव्हा मराठीतीली महान संतांनी ऋषींच्या भाषेला मराठी भाषेत आणलं. पुढे बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले, मराठी साहित्यात देशाच्या स्वातंत्र्याचा इतिहास आहे. ज्ञानबा तुकारामांच्या मराठीला राजधानी अतिशय मनापासून अभिवादन करतो. पवारांमुळे या कार्यक्रमात येण्याची संधी मिळाली. आजतर जागतिक मातृभाषा दिवस आहे. तुम्ही साहित्य संमेलनाचा दिवसही अतिशय चांगला निवडला. उषा तांबे म्हणाल्या, महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर दिल्लीतील पहिलं संमेलन पार पडलं. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतरचं संमेलन आहे. अब दिल्ली दूर नही है, असं म्हणायला लावणारं हे संमेलन आहे. शरद पवार म्हणाले, साहित्य संमेलन दिल्लीला याचा आनंद आहे. मराठी माणूस झेंडा अटकेपार फडकवणारा आहे. तो दिल्लीत दिसतो, गुजरातमध्ये ही दिसतो.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची कार बॉम्बने उडवून देऊ

## धमकी देणारे दोघे बुलढाण्यात सापडले,असा केला होता प्लॅन!

बुलडाणा, (वृत्तसंस्था) :– बुलडाण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. शिवसेनेचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्यासाठी धमकी देण्यात आली होती. दोन तरुणांनी ई–मेलद्वारे शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. अखेरीस पोलिसांनी तपासाची चक्र फिरवत दोन जणांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३५ वर्षीय मंगेश अच्युतराव वायाळ आणि २२ वर्षीय अभय गजानन शिंगणे असं या आरोपींची नावं आहे. मंगेश वायाळ हा ट्रक चालक असून अभय शिंगणे याचं देऊळगाव इथं मुख्य मार्गावर मोबाईल शॉपी आहे. या दोघांनाही दारूचे व्यसन असून या दोघांनी अभय शिंगणे याच्या मोबाईल शॉपीतून ही धमकी दिल्याची माहिती मिळाली आहे.विशेष म्हणजे, हे दोघेही नात्याने आते–माम भाऊ आहेत. या दोन्ही आरोपींना बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगावमही येथून मुंबई एटीएसने कारवाई करत ताब्यात घेऊन मुंबईकडे निघाले आहे. शिवसेनेचे पक्षप्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ठार मारण्याची धमकी देण्यात आली होती. गोरेगाव पोलीस ठाण्यात हा धमकीचा ई–मेल आला होता.

## पान १ वरून

अखिल मराठी साहित्य महाराष्ट्राचे साहित्यिक या सगळ्यांनी एका गोष्टीचा पाठपुरावा केला, तो म्हणजे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला.यासाठी नरेंद्र मोदींबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. पहिलं दिल्लीतील मराठी साहित्य संमेलन झालं, त्याचं उद्घाटन पंडित नेहरुंनी केलेलं. त्यासाठी काकासाहेब गाडगीळांनी तयारी केलेली. नेहरुंनी त्या साहित्य संमलेनाचं उद्घाटन केलेलं, या साहित्य संमेलनाचं उद्घाटन नरेंद्र मोदींनं केलेलं. मला गुरुस्थानी असलेले यशवंतराव चव्हाण चांगेल साहित्यिक होते. मी ३० वर्षाहून अधिक काळ मराठी अस्मितेसाठी जे जे काही करता येईल, ते केलं म्हणून माझ्यावर स्वागताध्यक्ष म्हणून जबाबदारी आहे. माझ्याकडे खंत व्यक्त केलेली, आतापर्यंत इतकी संमेलने झाले, पण फक्त चारच महिलांना अध्यक्ष होण्याचा मान मिळाला. पण यावेळी एका महिला साहित्यिकाला हा मान मिळाला, याचा आनंद आहे. अखिल भारतीय साहित्य महामंडलाला धन्यवाद देतो. मराठेशाहीने आपला झेंडा अटेकपार फ़डकवला याचा मराठी साहित्यिकांना सार्थ अभिमान आहे.पाणिपतचा इतिहासही आपल्याकडे आहे. तो आपण काही विसरु शकत नाही.वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर या साहित्यिकांनी देशपातळीवर आपली ओळख निर्माण केली. मराठी भाषेची पताका नारायण सुर्वे..... यांच्यासारख्या कवींनीअण्णाभाऊ साठेंनी गावकुसावरील जगणं मराठी साहित्यात आणलं. संतांनी मराठी साहित्य समृद्ध केले. साहित्य संमेलन जाहीर झाल्यावर महाराष्ट्रात एक चर्चा सुरु होती राजकारण्यांचा इथं काय संबंध? माझं स्वच्छ मत आहे, राजकारण– साहित्यिक यांच्यातील परस्पर पूरक ..कलेला राजाश्रय या वादावर आता पडदा पडावा,असंही पवार यांनी नमूद केलंय.

# श्री संत गजानन महाराज प्रगट दिन उत्साहात साजरा

अंबाजोगाई, (प्रतिनिधी):– संत शिरोमणी शेगाव निवासी संत श्री गजानन महाराज यांचा प्रगट दिन अंबाजोगाईत गजानन महाराज भक्त गणांच्या वतीने गुरूवारी उत्साहात साजरा करण्यात आला. शहराच्या चौसाळकर वसाहत भागातील श्री संत शिरोमणी गजानन महाराज यांच्या मंदिरात श्रीच्या मूर्तीस रुद्राभिषेक, इतर धार्मिक कार्यक्रम तसेच ह.भ.प.आत्माराम शास्त्री यांचे किर्तन होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने हौसिंग सोसायटी भागातील दत्त मंदीरात रुद्राभिषेक तसेच ह.भ.प.प्रज्ञाताई रामदासी यांचे किर्तन व महाप्रसाद आणि इतर धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. नागझरी (सरस्वती वसाहत) भागातील संत गजानन महाराज मंदिरातही रुद्राभिषेक,पारायण आणि ह.भ.प.महारुद्र महाराज खाडे यांचे किर्तन झाले आणि उपस्थित भक्तांना महाप्रसाद देण्यात आला. संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनी सर्वत्र महिला,भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# राष्ट्रसंत गाडगे बाबा सार्वजनिक जयंती उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे: अ‍ॅड.सुधीर जाधव

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची १४९ वी जयंती रविवार दि.२३ फेब्रुवारी २०२५ रोजी साजरी करण्यात येणार आहे. शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ असलेल्या राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या पुतळ्यास सकाळी १० वा. परिट समाज बांधवांच्या मुख्य उपस्थितीत अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर राष्ट्रसंत गाडगे महाराज सांस्कृतिक सभागृह मोंढा रोड बीड येथे सकाळी ११ वाजता प्रतिमेचे पूजन व समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या दोन्ही कार्यक्रमास परिट समाजातील बंधु-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन परिट-धोबी समाज सेवा मंडळाचे मराठवाडा विभागीय युवक अध्यक्ष अ‍ॅड.सुधिर जाधव यांनी केले आहे. प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची १४९ वी जयंती निमित्त विविध उपक्रम राबविले जाणार असून यामध्ये स्वच्छता अभियान, महाप्रसाद, समाजोपयोगी कार्यक्रम राबवून एक आगळी-वेगळी जयंती साजरी करण्यात येणार आहे. रविवार दि. २३ फेब्रुवारी रोजी सायं.६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून ते राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. तरी सर्व पदाधिकार्यांनी व गाडगे बाबा प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन परिट-धोबी समाज सेवा मंडळाचे मराठवाडा विभागीय युवक अध्यक्ष अ‍ॅड. सुधिर जाधव, माजी प्रदेशाध्यक्ष गणेश जगताप, यांच्यासह बीड शहराध्यक्ष अंबादास नवले, जिल्हाध्यक्ष श्रीमंत गोतावळे, जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, जिल्हा उपाध्यक्ष जगन्नाथ शिंदे, पप्पु शिंदे, शिवसेना उप जिल्हाप्रमुख अजय जाधव, शहर सचिव जयंत राऊत, मुरलीधर राऊत, विलास जाधव, निकम महाराज, जिल्हा सचिव प्रविण साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष संजय साळुंके, विभागीय उपाध्यक्ष संतोष पवार, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, जिल्हा उपाध्यक्ष जीजा शिंदे, शहर सचिव अतुल साळुंके, मनोज नवले, श्रीकांत नलावडे, समर्थ नवले, मनोज वाघमारे, प्रकाश जाधव, गणेश राऊत, रवि जाधव, संजय नवले, शहर उपाध्यक्ष शितल राऊत, प्रा.विजय जाधव, आदींनी केले आहे.



### ...अशी निघणार मिरवणूक

**राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती निमित्त सायं. ६ वा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. मिरवणूक बशीरगंज मार्गे, राजुरीवेस, कारंजा, बलभिम चौक, धोंडीपुरा, माळीवेस, सुभाष रोड मार्गे राष्ट्रसंत गाडगे बाबा महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन समारोप करण्यात येणार आहे.**

## संस्कार विद्यालयात नावीन्यपूर्ण उपक्रम...!

**बीड । प्रतिनिधी**

संस्कार विद्यालय बीड येथील इयत्ता तिसरी/चौथी विभागात कार्यानुभव क्षेत्रभेट अंतर्गत एक नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका जाधव ताई यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

यामध्ये माती काम करणारे कुंभार वाड्यातील कल्याण देशमुख यांनी विद्यार्थ्यांना माती पासून पणती, माठ,कुंडी, पैसे ठेवायचा गल्ला इ.विविध वस्तू प्रात्यक्षिकाद्वारे करून दाखवल्या. तसेच त्या वस्तू विद्यार्थ्यांकडून करूनही घेतल्या. त्यात तिसरी चौथी वर्गासोबत इंग्रजी माध्यमाचाही सहभाग होता. या कार्यक्रमासाठी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका जाधव ताई, तिसरी चौथी विभागाचे विभाग प्रमुख गिरी सर तसेच इंग्रजी विभागाचे प्राचार्य परजने सर, सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. क्षेत्रभेट हा उपक्रम वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय सुंदर असा घेण्यात आला. यातून विद्यार्थ्यांना नवीन गोष्टीचे ज्ञान प्राप्त झाले.



## दैठणामध्ये विविध कार्यक्रमाने शिवजयंती साजरी

### डिजेचा गाजावाजा न करता, सामाजिक उपक्रमांतून शिवजयंती साजरी

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील दैठणा गावामध्ये विविध कार्यक्रमाने शिवजयंती साजरी करण्यात आली.

गावातील महिलांनी पाळणा म्हणून शिवजन्मोस्तव साजरा केला त्यानंतर गावातील ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले शिवजयंती उत्सव समितीतर्फे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दैठणा शिक्षक श्री अशोक तोतरे (मुख्याध्यापक) ,सहशिक्षक श्री विकास खेडकर ,श्रीमती काझी मॅडम यांना शाळेची जिल्हा मध्ये गुणवत्ता टिकून ठेवल्या बद्दल व शाळेतील चांगल्या कार्य बद्दल सन्मानचिन्ह सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला त्यानंतर शाळेतील विद्यार्थी चे भाषणे व विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले शिवजयंती उत्सव समिती , डॉ.दादासाहेब कदम ,डॉ. तुषार पवार व कदम फार्मा डिस्ट्रीबुटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिर घेण्यात आले दैठणा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलांना खाऊ, वही, पेन देण्यात आले नंतर सर्व शिवभक्तांनी दैठणा ते कडा कारखाना रॅली काढली व कडा कारखाना येथे मावळा ग्रुप ने कडा कारखाना येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान केले तसेच समस्त ग्रामस्थ दैठणा व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दैठणा यांचे कार्यक्रम उत्साहात पार पडले त्याबद्दल शिवजयंती उत्सव समितीतर्फे विशेष आभार व्यक्त करण्यात आले तसेच सर्व शिवभक्तांनी डीजे मुक्त शिवजयंती साजरी करून एक नवीन आदर्श जनतेसमोर ठेवला.



**शिवजयंती उत्सव निमित्त, डॉ. दादासाहेब कदम, डॉ.तुषार पवार व कदम फार्मा डिस्ट्रीबुटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबीर पार पडले यावेळी शकडो नागरिकांनी या शिबिरात सहभाग नोंदवला व आपल्या आरोग्याची तपासणी मोफत करुण घेतली आहे..**

## गंगाई फार्मसी कॉलेजची औषध निर्माण कंपनीला भेट



**कडा । प्रतिनिधी**


कडा येथील आनंद चॅरिटेबल संस्था संचलित गंगाई फार्मसी कॉलेज कडा च्या विद्यार्थ्यांनी कोल्हापूर येथील रिपकॉर्ड फार्मसिुटिकल्स या औषध कंपनीला गुरुवार दिनांक १३ फेब्रुवारी रोजी भेट दिली. या औषध कंपनीमध्ये विद्यार्थ्यांना औषध तयार करण्यासाठी लागणारे रॉ मटेरियल कशाप्रकारे येते, कशाप्रकारे त्याची प्रथम तपासणी केली जाते, कशाप्रकारे त्याचे स्टोरेज केले जाते त्यानंतर औषधे कसे तयार केले जातात, तयार केलेल्या औषधाचे पॅकिंग कसे केले जाते, तसेच तयार औषधे तयार करताना व औषधे तयार केल्यानंतर त्याची क्वालिटी कंट्रोल डिपार्टमेंट मार्फत कशी तपासणी केली जाते व औषधे तयार केल्यानंतर त्याचे स्टोरेज कसे प्रकारे करायचे व त्यानंतर त्या औषधांचे वितरण कसे करावे याचे याची सर्व माहिति रिपकॉर्ड फार्मासुटिकल्स च्या स्टाफ ने विद्यार्थ्यांना दिली. या कंपनीचा प्लांट थक्ज आणि ऋ्चझ च्या अनुपालनांनुसार डिझाइन केलेला आहे. ही कंपनी निर्यात दर्जाची औषधे तयार करण्यावर लक्ष केंद्रित करतात.

विद्यार्थ्यांना औषध निर्माण कंपनी पाहण्याची संधी रिपकॉर्ड फार्मासुटिकल्स चे डायरेक्टर श्री भाविन मधू सर व जनरल मॅनेजर सौ.प्राजक्ता पाटील मॅडम यांनी करून दिल्याबद्दल व विद्यार्थ्यांना औषध निर्माण कंपनीचे योग्य ज्ञान दिल्याबद्दल, त्यांच्या स्टाफने योग्य मार्गदर्शन केल्याबद्दल कॉलेजचे प्राचार्य श्री अशोक गदादे सर यांनी त्यांचे आभार मानले.

## पत्रकार नवनाथ कांबळे यांचा मुलगा अर्णव चे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रूड येथील खोलेश्वर (विद्यालय) परिवाराच्या वतीने तिसरी ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये इयत्ता तिसरीच्या वर्गातून येथील पत्रकार नवनाथ कांबळे यांचा मुलगा अर्णव कांबळे हा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला असून, येथे तिसरी ते नववी पर्यंतचे जिल्हा व जिल्हाबाह्य विद्यार्थी शिष्यवृत्ती पूर्व परीक्षेला बसले होते. यामध्ये तिसरी ते नववी तील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रत्येकी प्रथम व टॉप टेन नंबर काढण्यात आले.



या शिष्यवृत्ती पूर्व परीक्षेसाठी जिल्ह्यासह परिसरातून तब्बल २६५७ विद्यार्थी सहभागी झाले होते. इयत्ता तिसरी ते नववी पर्यंतच्या वर्गातून टॉप वीस विद्यार्थ्यांची निवड शिष्यवृत्तीसाठी करण्यात आली. परीक्षेचा निकाल अवघ्या तीन तासात जाहीर करण्यात आला. इयत्ता तिसरीच्या वर्गातून अभिनव इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी पत्रकार नवनाथ कांबळे यांचा मुलगा अर्णव कांबळे हा पहिला आल्यामुळे त्याचा खोलेश्वर विद्यालयाच्या वतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीपराव पारेकर यांच्या वतीने पुष्पगुच्छ व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी बहुतांश पालक वर्ग व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## महाराष्ट्र युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिव पदी बीडचे आकाश मस्के

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिव पदी बीड तालुक्यातील पालवण येथील आकाश मस्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून ते युवक काँग्रेसमध्ये सक्रिय आहेत. कसलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना यापूर्वी त्यांनी काँग्रेसचे राज्य समन्वयक, युवक जिल्हा सरचिटणीस, सेवादल जिल्ह्या उपाध्यक्ष या पदावर काम करून काँग्रेसचे ध्येय धोरण ग्रामीण भागापर्यंत पोहचण्याचे काम केले आहे. युवक काँग्रेसच्या माध्यमातून राज्यभर झालेल्या आंदोलनामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. आंदोलनादरम्यान त्यांच्यावर अनेक केसेस झालेल्या आहेत.



## अंथरवण पिंप्री आश्रम शाळेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड पासून जवळच असलेल्या श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ बीड संचलित, प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा तथा दिनानाथ बालकाश्रम अंथरवण पिंप्री तांडाच्या प्रांगणात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध कार्यक्रमासह उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य खंदारे सर, प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक शिंदे सर, पर्यवेक्षक जवरे सर, ज्येष्ठ शिक्षक पैठणे सर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला, या कार्यक्रमाची तयारी श्रीमती खंदारे मॅडम, जवंजाळ डी.ए. सर यांनी घेतली. याप्रसंगी शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी व स्टेजवरील मान्यवरांनी महाराजांच्या जीवन कार्यावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला.



### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एस. पी. वानखडे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६३/२०२५**

**बाबुराव भिमा राठोड वगैरे विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **गुणाबाई भ्र. बाबुराव राठोड** हे / हया दिनांक ३१/०१/२०२५ रोजी मौजे पवारवाडी, पोस्ट पाचेगांव, ता. गेवराई जि. बीड, येथे मयत झाले / झाल्या आहेत. अर्जदार क्र. १. बाबुराव पि. भिमा राठोड, वय ७२ वर्षे, धंदा शेती, रा. पवारवाडी, पोस्ट पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड, २. प्रकाश पि. बाबुराव राठोड, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. पवारवाडी, पो. पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड, ३. संजय पि. बाबुराव राठोड, वय ४७ वर्षे धंदा शेती, रा. पवारवाडी, पो. पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड, ४. राजेंद्र पि. बाबुराव राठोड, वय ४९ वर्षे धंदा शेती, रा. पवारवाडी, पो. पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड, ५. लता भ्र. कैलास राठोड, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. पवारवाडी, पो. पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड, ६. प्रेम पि. कैलास राठोड, वय १७ वर्षे, अ. पा. क. आई अर्जदार क. ५, रा. सदर ७. सागर पि कैलास राठोड, वय १५ वर्षे, अ. पा. क्र. आई अर्जदार क्र. ५, रा. सदर, थानी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत गुणाबाई भ्र. बाबुराव राठोड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १८/०२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख २१ / ०३ / २०२५**
**(मार्फत ॲड. एस. एल. मेघारे, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**
**शिक्का**

### जाहीर प्रगटन

**धारुर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ४६/२०२५, ऐजाज वि निरंक**

मयताचे नाव :मयत **जीमल अफजलखान पठाण** रा. दुधिया गल्ली धारूर ता. किल्ले धारूर जि. बीड हे दि. १३/०५/२०१९ रोजी मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार

१. ऐजाज खान जमीलखान पठाण वय ३० वर्षे, धंदा - मजूरी रा. दुधिया गल्ली धारूर ता. किल्ले धारूर जि. बीड, २. असमा पि. जमीलखान पठाण वय २९, धंदा घरकाम रा. बाराभाई गल्ली धारूर ता. किल्ले धारूर जि. बीड

यांनी या न्यायालयास मयत **जीमल अफजलखान पठाण** रा. दुधिया गल्ली धारूर ता. किल्ले धारूर जि. बीड हे मयत झाले हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारास शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता. व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार

सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **मयत जीमल अफजलखान पठाण** रा. दुधिया गल्ली धारूर ता. किल्ले धारूर जि. बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :०६/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : २८/०२/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, धारूर**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**
**शिक्का**

### जाहीर प्रगटन

**श्री. एन. एम.वाली. दिवाणी न्यायाधिश क.स्तर, धारूर यांचे न्यायालयात**

**दिवाणी चौकशी अर्ज क. ५७/२०२५, निशाणी क. १२ ड**

अर्जदार - १. उर्मिला भ्र. रामधन आवळे,वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा.सोरफळी ता. धारूर जि.बीड. २.शुभम पि. रामधन आवळे, वय ०७ वर्षे, धंदा निरंक, अ.पा.क. आई अर्जदार नं. १ उर्मिला भ्र रामधन आवळे वय ३० वर्षे रा. मोरफळी ता. धारूर जि. बीड. ३. सोमती पि. रामधन आवळे वय ०९ वर्षे धंदा निरंक अ.पा.क. आई अर्जदार नं. १ उर्मिला भ्र. रामधन आवळे वय ३० वर्षे रा. मोरफळी ता. धारूर जि. बीड. ४. आश्विणी पि. रामधन आवळे, वय १० वर्षे धंदा निरंक अ.पा.क. आई अर्जदार नं. १ उर्मिला भ्र. रामधन आवळे वय ३० वर्षे रा. मोरफळी ता. धारूर जि. बीड. ५.सखुबाई भ्र आधुला आवळे वय ६० वर्षे धंदा घरकाम रा. मोरफळी ता. धारूर जि. बीड.

विरुध्द

सामनेवाला - कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहिरनामा / जाहिरनोटीस द्रवारे असे कळविण्यात येते की, ज्या पेक्षा मयत **रामधन पिता आश्रुबा आवळे** रा. मोरफळी ता. धारुर जि. बीड यांचे दिनांक २३/०५/२०२० रोजी मौजे मोरफळी ता. धारुर जि. बीड येथे निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत.

मयत **रामधन पिता आश्रुबा आवळे** यांचे पश्चात शासकिय / निमशासकिय व इत्तर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीना अर्जदार हे मयत रामधन पिता आश्रुबा आवळे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावाव घेउन मे न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. आज तारीख १७/०२/२०२५ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाने शिक्यानिशी दिला. प्रकरणात पुढील दिनांक : २४/०३/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, धारूर**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**
**शिक्का**

### जाहीर प्रगटन

**धारुर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ५८/२०२५ मंदाकिनी भास्कर कदम वि. निरंक**

मयताचे नाव : **मयत अमोल पि. भास्कर कदम** रा. आमला पो. हिंगणी बु. ता. किल्ले धारूर जि. बीड हे दि. ०२/१२/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार

१.मंदाकिनी भ्र. भास्कर कदम वय ६० वर्षे धंदा - घरकाम रा. आमला पो. हिंगणी बु. ता. धारुर जि. बीड.

यांनी या न्यायालयास **मयत अमोल पि. भास्कर कदम** रा. आमला पो. हिंगणी बु. ता. किल्ले धारूर जि. बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारास शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार

सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हवताबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अमोल पि. भास्कर कदम रा. आमला पो. हिंगणी बु. ता. किल्ले धारूर जि. बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : २०/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **पुढील तारीख : १९/०३/२०२५**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, धारूर**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**
**शिक्का**

### जाहीर प्रगटन

**धारुर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ४३/२०२५, शकुंतला व इतर वि निरंक**

मयताचे नाव :मयत **दादासाहेब पि. सखाराम लगड** रा. तेलगाव ता.किल्ले धारूर जि. बीड हे दि.२८/०८/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार

१. शकुंतला भ्र. दादासाहेब लगड वय ५६ वर्षे, धंदा-शेती, रा. तेलगाव ता.किल्ले धारूर जि. बीड, २. आनंद पि.दादासाहेब लगड वय ३६ वर्षे धंदा शेती, रा.तेलगाव ता.किल्ले धारूर जि. बीड, ३. अमोल पि.दादासाहेब लगड वय ३२ वर्षे धंदा शेती, रा.तेलगाव ता.किल्ले धारूर जि. बीड, ४.निलेश पि.दादासाहेब लगड वय २८ वर्षे धंदा शेती, रा.तेलगाव ता.किल्ले धारूर जि. बीड, ५. जयश्री भ्र. संतोष नरवडे वय ३० वर्षे धंदा-घरकाम रा.ता.माजलगाव जि.बीड

यांनी या न्यायालयास मयत **दादासाहेब पि.सखाराम लगड** रा. तेलगाव ता.किल्ले धारूर जि. बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारास शासकीय योजनेचा लाभ ेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार

सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत **दादासाहेब पि. सखाराम लगड** रा. तेलगाव ता.किल्ले धारूर जि. बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक : ०६/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : २७/०२/२०२५**


**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, धारूर**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**
**शिक्का**

दैनिक मराठवाडा पत्र | मराठवाडा विशेष | शनिवार, दि. २२ फेब्रुवारी २०२५ | पान ४

# शिवजयंती निमित्त शिवसंग्रामच्या वतीने 'छावा' चित्रपटाचे 25 फेब्रुवारी रोजी विशेष मोफत आयोजन

## महिला , विद्यार्थी , आणि शिवसंग्राम पदाधिकारी यांच्यासाठी खास मोफत शो




**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त शिवसंग्राम च्या वतीने महिला , विद्यार्थी आणि शिवसंग्राम पदाधिकारी यांच्यासाठी शौर्य आणि धैर्याचे मूर्तीमंत प्रतीक छत्रपती संभाजी राजांच्या जीवनावर आधारित छावा चित्रपटाचे २५ फेब्रुवारी रोजी विशेष मोफत आयोजन. करण्यात आले आहे. असे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी सांगितले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून सध्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित गाजत असलेल्या छावा चित्रपटाचे महिला , विद्यार्थी , तरुण आणि शिवसंग्राम पदाधिकारी यांच्यासाठी मोफत शो आयोजन करण्यात आले आहे. हा चित्रपट युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यगाथेवर आधारित असून महाराष्ट्रातील शिवभक्तांमधून त्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे.महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले व या भूमीत जन्मलेल्या या दोन्ही महाराजांनी अखंड हिंदुस्तानचा इतिहास रचला आहे.या चित्रपटाच्या माध्यमातून लोकांना छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवन आणि त्यांचा संघर्ष अनुभवता यावा त्याचबरोबर महिला , विद्यार्थ्यांना संभाजी महाराजांचा जीवनपट मोठ्या पडद्यावर पाहता यावा या करिता आपण हा चित्रपट शिवसंग्रामच्या माध्यमातून दाखवणार आहोत असेही ज्योती मेटे यांनी म्हटले आहे.



# ऑनलाइन जागतिक अबॅकस मध्ये रोहन ढोके सर्वोत्कृष्ट वर्ल्ड चॅम्पियन ऑफ-चॅम्पियन

**बीड । प्रतिनिधी**

जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जागतिक स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये बीड शहरातील चंपावती विद्यालयाचा विद्यार्थी रोहन राहुल ढोके याने फक्त पाच मिनिटांमध्ये शंभर प्रश्न सोडवत ऐतिहासिक यश संपादन करत सर्वोत्कृष्ट वर्ल्ड चॅम्पियन ऑफ-चॅम्पियन मिळवली. रोहन ढोके याने चॅम्पियनशिप ऑफ-चॅम्पियन मिळविल्यामुळे त्याची लंडन चॅम्पियनशिप साठी निवड झाली. रोहन ढोके याने मिळवलेल्या या ऐतिहासिक उज्ज्वल यशाबद्दल आणि त्याची लंडन चॅम्पियनशिप साठी निवड झाल्याबद्दल रोहन ढोके याच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शालेय स्तरावरील



सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होत असून शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जागतिक स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये बीड शहरातील चंपावती विद्यालयाचा विद्यार्थी रोहन राहुल ढोकेने अवघ्या पाच मिनिटांमध्ये १०० गणित सोडवून ऐतिहासिक असे उज्ज्वल यश संपादन केले आहे. रोहन राहुल ढोकेने फक्त पाच मिनिटांमध्ये शंभर प्रश्न सोडवल्यामुळे त्याला चॅम्पियनशिप ऑफ चॅम्पियन मिळाली. येत्या २७ मे २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या लंडन अबॅकस चॅम्पियनशिपसाठी चि. रोहन राहुल ढोके याची निवड झाली आहे. वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, तैवान, चीन, जपान, सिंगापूर अशा जगातील ११ देशातील १९४५ एकूण विद्यार्थ्यां पैकी रोहन राहुल ढोकेची चॅम्पियनशिप चॅम्पियन फर्स्ट यश मिळवून जागतिक स्तरावर निवड झाली आहे.

# १४ लक्ष रुपय खर्च करुन बांधलेले शौचालय बनले शोभेची वस्तु!

## टँक नसल्याकारणाने शौचालय फक्त नावालाच ; लघु शंका मात्र उघड्यावर

**विश्वास शिनगरे**

येथील बस स्थानकामध्ये महामंडळाकडून १४ लक्ष रुपये खर्च करून शौचालयाच्या इमारतीची उभारणी केली आहे स्वच्छालयास आऊटलेट चा टँक नसल्याकारणाने शौचालय शोभेची वस्तु बनले असून शौचालय लघुशके साठी वापरात येत नाही यामुळे महिला व नागरिकांची मोठी गैरसोय होत



आहे. अभियंत्याने अंदाजत्रकात स्वच्छालयाचा सेफ्टी टँक न बनवताच हे काम करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. किल्ले धारूर बसस्थानक परिसर नेहमीच प्रवाशांनी गजबजलेला असतो या परिसरात अद्यावत स्वच्छालय असणे गरजेचे होते त्या अनुषंगाने महामंडळाकडून १४ लक्ष रुपये खर्च करून शौचालयाची इमारत बांधण्यात आली या इमारतीला आउटलेटचा टँक नसल्याकारणाने मागील अनेक दिवसापासून हे स्वच्छालय शोभेची वास्तू बनून राहिले आहे महामंडळाकडून स्वच्छ बस स्थानक अभियान राबविण्यात येते यावर लाखो रुपये खर्च होतात पण धारूर बस स्थानक या अभियानात सपशेल फेल झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे केवळ ठेकेदार पोसण्यासाठी लाखो रुपयाची उधळपट्टी महामंडळाकडून होत आहे असा प्रश्न तालुक्यातील प्रवाशांना पडत आहे.

# मुलींने खोट्या प्रेमाच्या जाळ्यात फसू नये, आई-बापावर जिवापाड प्रेम करावं : प्रा.वसंत हंकारे

**आष्टी । प्रतिनिधी**

जोपर्यंत आई-बापाचा श्वास सुरू आहे,तोपर्यंत आई-बापाच्या प्रत्येक श्वासावर प्रेम करा,आई-बाप गेल्यावर कोणत्याही देवाच्या चरणी लाखो रुपये ओतले तरी तो आपले आई-वडील परत देऊ शकत नाही,असे प्रतिपादन व्याख्याते प्रा. वसंत हंकारे यांनी केले.



आष्टी येथील पंचायत समिती प्रागाणात गुरूवार (दि.२०) रोजी युवानेते राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्ताचे औचित्य साधत महाराष्ट्राचे प्रमुख व्याख्याते प्रा.वसंत हंकारे यांचे भरकटलेली तरूणाई व न समजलेले आई-बाप समजून सांगताना ते बोलत होते.यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर,माजी जि.प.सदस्य देविदास धस, महाराष्ट्र सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे,माजी पंचायत समिती सभापती बद्रीनाथ जगताप,तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर हंबर्डे, मुर्शदपुरचे सरपंच अशोक मुळे,आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे,सुमतीलाल मेहेर, ॲड. बाळासाहेब मोरे,अतुल मेहेर यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.

# माजलगावच्या जयहिंद मित्रमंडळाच्या वतीने शिवजन्मोत्सव साजरा



**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील जयहिंद मित्र मंडळाच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. यात दि. १८ रोजी संतोष महाराज आढावणे भोकरदनकर यांचे रात्री ९ ते ११ यावेळेत हरिकिर्तन झाले. यावेळी महिला, पुरूष भाविकांची मोठी उपस्थिती होती.

दि. १९ फेब्रुवारीला शिवप्रतीमा पुजन व विवीध क्षेत्रातील गुणवंत/समाजसेवकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी माजी आमदार मोहनराव सोळंके हे तर डॉ. प्रकाश आनंदगांवकर, सभापती जयदत्त नरवडे, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, नवनाथ धाईजे, राजेश घोडे यांची उपस्थिती होती. यावेळी एमपीएससी परिक्षेत उत्तीर्ण व्ही. भी. दहीवाळ, नृतकलाकार वैभवी टाकणखार, समाजसेवक रामनवाजी जालनेकर यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक अच्युत लाटे यांनी केले तर मोहनराव सोळंके, डॉ. आनंदगांवकर यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, जयहिंद मित्र मंडळ हे नेहमीच गुणवंतांचे सत्कार करण्यात अग्रेसर आहे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी असे उपक्रम महत्वाचे असल्याचे सांगीतले.

# शासकीय नर्सिंग महाविद्यालय बीड येथे योगतज्ञ श्रीमती डॉ. राधा तांबे यांचे योग साधना शिबिर संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

नार्यस्तु राष्ट्रस्य श्वः अर्थात नारी ही उज्वल राष्ट्राचे भविष्य आहे. प्राचीन हडप्पाकालीन संस्कृती पासून ते आजच्या आधुनिक युगापर्यंत नारीने समाजाला आणि देशाला नवी आशा आणि दिशा देण्याची काम केले आहे. प्राचीन हडप्पा संस्कृती स्त्रीप्रधान संस्कृती होती, यावरूनच आपल्याला महिलांचे महत्त्व अर्थसत्ता आणि राजसत्ता मध्ये किती महत्त्वाचा आहे हे दिसून येते. गेले कित्येक दिवस रथसप्तमी निमित्त राज्यभरामध्ये ठिकठिकाणी सूर्यनमस्कार स्पर्धाचे आयोजन होत आहे, त्या ठिकाणी मला योगतज्ञ व योग मार्गदर्शक या नात्याने उपस्थित राहण्यास मिळत आहे. मात्र या सर्वांमध्ये शासकीय नर्सिंग महाविद्यालयामध्ये गेले दहा दिवस चाललेल्या योग साधना शिबिरचा अनुभव खूप अनोखा



आहे ,यामध्ये सुमारे २०० मुला-मुलींनी संपूर्ण १० दिवस उपस्थित राहून योग मधे दाखवलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल अत्यंत सकारात्मक अनुभव आला. समाजाची सेवा करणाऱ्या या भावी परिचार्या असणाऱ्या मुली रुग्णांची सेवा करण्यात स्वतःचे आयुष्य झिजवतात. मात्र स्वतःला पाहिजे तेवढा वेळ आणि लक्ष देता येत नाही, त्यामुळे समाजाची सेवा करत स्वतः देखील कसे सक्षम राहता येईल यासाठी नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ सुवर्ण बेद्रे मॅडम आणि आयुष विभागाचे डॉ.लिंबकर यांनी मुलींसाठी दहा दिवसाचे योग साधना शिबिर आयोजित करण्याचे निर्णय घेतला. त्यामध्ये अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, अगदी पहिल्या दिवसापासून ते समारोप सोहळ्यापर्यंत सर्वांच्या मनामध्ये इतकाच उत्साह दिसून आला जो क्वचित अनुभवास येतो. योग क्षेत्रात मी अनेक शिबिरे आयोजित केली, मात्र या शिबिरामध्ये मुलींनी दाखवलेला प्रतिसाद अद्भुतपूर्वक आणि आनंददायक होता. शास्त्रशुद्ध पद्धतीने योगा सूर्यनमस्कार कसा करता येईल याचे बेसिक पासून डव्हान्स योगासने, प्राणायाम, योग निद्रा याचे मार्गदर्शनव प्रशिक्षण देण्यात आले. मुलींची योगाची रुची पाहून अजून जास्त शास्त्रशुद्ध पद्धतीने योग शिकवण्यात तितकाच आनंद मनाला होत होता. पुरुषाला घराचा उंबरठा ओलांडताना फक्त कुटुंबाचा विचार करावा लागतो, मात्र स्त्रीला घराचा उंबरठा ओलांडताना वाईट नजरेआड लपलेल्या जगाचा विचार करावा लागतो.

# बीड जिल्हा पत्रकार संघाच्या आष्टी तालुकाध्यक्षपदी प्रविण पोकळे यांची नियुक्ती

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने नुकत्याच जिल्ह्यातील तालुका पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या असून यामध्ये आष्टी तालुकाध्यक्ष पदी प्रविण राम पोकळे यांची नियुक्ती केली आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे आणि जिल्हाध्यक्ष शेख रिझवान यांनी जिल्ह्यातील नवीन तालुकाध्यक्षांची नियुक्ती जाहीर केली आहे.पत्रकार प्रविण पोकळे यांची तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचे लोकनेते आ.सुरेश धस,माजी आ.भीमराव धोंडे,माजी आ.बाळासाहेब आजबे,माजी आ.साहेबराव दरेकर,युवा नेते जयदत्त धस, युवा नेते सागर धस,जि. प.माऊली जरांगे,नगराध्यक्ष जिया बेग,गणेश शिंदे, उद्योजक बंडू तोडकर, आदिंनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.






# अबॅकसच्या माध्यमातून सोमनाथ गिते सरांनी विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताची भीती दूर केली : केंद्रप्रमुख संभाजी सोनवणे

## शिवजन्मोत्सव दिनी गिते सरांच्या जी चॅम्प अबॅकसच्या मुलांचा गुणगौरव संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

ज्या प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करून मराठी माणसाच्या मनात अस्मिता जागृत केली. त्याचप्रमाणे आदर्श शिक्षक सोमनाथ गिते सरांनी अबॅकसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात असणारी गणिताची भीती दूर केली. त्याच बरोबर खऱ्या अर्थाने त्यांनी या सर्व विद्यार्थ्यांचा भावी जीवनाचा पाया भरण्याचे काम केले असल्याचे मत खालापुरी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. संभाजी सोनवणे यांनी गिते सरांच्या अबॅकस क्लासेसमध्ये आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि अबॅकस परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळा कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्षीय स्थानावरून बोलताना व्यक्त केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार श्री आत्माराम वाव्हळकर सर, यशवंत विद्यालयाचे आदर्श शिक्षक श्री कृष्णाचंद्र गाडेकर, आरोग्य संघटनेचे अध्यक्ष श्री भारत नागरगोजे साहेब तर पालक प्रतिनिधी म्हणून आदर्श शिक्षक श्री. प्रशांत मिसाळ, विद्यानिकेतन अकॅडमीचे संचालक श्री. वैजिनाथ धेंडुळे आणि जी चॅम्प अबॅकसचे ब्रेन डेव्हलोपमेंट मास्टर श्री. सोमनाथ गिते सर आदी उपस्थित होते. बीड शहरातील धानोरा रड परिसरात गेली पाच वर्षांपासून यशस्वीपणे सुरू असलेल्या गिते सरांच्या जी चॅम्प अबॅकस क्लासेसमध्ये बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आणि छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या अबॅकस



नॅशनल लेव्हलच्या कॉम्पिटिशनमध्ये उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याच्या सुरुवातीला छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर अबॅकस जी चॅम्पियन या परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह, मेडल देऊन सत्कार करण्यात आला. या वर्षीचा जी चॅम्प मराठवाडा विभागाचा बेस्ट अबॅकस टीचर अवार्ड श्री सोमनाथ गिते सरांना मिळाला. त्या बद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभानंतर चि. शिवतेज गिरे, चि. सत्यमेव सरपते, कु.भक्ती चौरे, कु. श्रुती वाव्हळकर, कु. श्रद्धा कागदे, चि. समर्थ मिसाळ या चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर भाषण केले. त्यानंतर श्री. गाडेकर सर, श्री. वाव्हळकर सर आणि श्री. धेंडुळे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर विचार व्यक्त केले तसेच या वेळी त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे तोंडभरून कौतुक केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना केंद्रप्रमुख श्री. संभाजी सोनवणे सर यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयी माहिती देताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील घडामोडी गोष्टी रूपाने विद्यार्थ्यां समोर मांडल्या. यावेळी पुढे बोलताना श्री सोनवणे सर म्हणाले की, ज्या प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करून मराठी माणसाच्या मनात अस्मिता जागृत केली. त्याचप्रमाणे आज आदर्श शिक्षक श्री सोमनाथ गिते सरांनी विद्यार्थ्यांच्या मनात गणिता विषयी असणारी भीती अबॅकसच्या माध्यमातून दूर केली. आज विद्यार्थ्यांना गणिता विषयी प्रचंड आवड निर्माण झाली आहे. त्यामुळे हे सर्व विद्यार्थी सध्या अगदी हसत-खेळत आणि आवडीने गणिताच्या क्रिया करू लागले आहेत. गणिताचे विविध उदाहरणे सोडवू लागले आहेत. श्री सोमनाथ गिते सरांनी घेतलेल्या कष्टामुळे भविष्यात हे विद्यार्थी गणित आणि इतर विषयात निश्चित निपून राहतील यात काही शंका नाही. वास्तविक पाहता खऱ्या अर्थाने श्री. सोमनाथ गिते सरांनी अबॅकसच्या माध्यमातून या सर्व विद्यार्थ्यांच्या जीवनाचा पाया भरण्याचे काम केले आहे.